ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.IX/March 2012pp.1-4

Research Paper

अमरावती शहरातील 1942 चा स्वातंत्र्यलढा – एक चिकित्सक अध्ययन

प्रा. राजु भा. खरडे
आर.बी. व्यास कला व वाणिज्य महाविद्यालय, कोंढाळी.

प्रस्तावना–

अमरावती विदर्भाची सांस्कृतीक राजधानी असून, अमरावतीचा रामायण व महाभारतात सुध्दा उल्लेख आलेला आहे. १८५७ चा पहिला स्वातंत्र्यलढा अयशस्वी झाल्यानंतर ब्रिटीश अत्याचाराला घाबरून अनेक योध्दयांनी सांधुसंन्याशांच्या वेशात अमरावती शहरात काही दिवस घालविले. कॉग्रेसची स्थापना होताच अमरावतीमध्ये राजकिय जागृती व्हायला सुरवात झाली. १८९० मध्ये लंडनला जाणाऱ्या कॉग्रेसच्या शिष्टमंडळात अमरावतीचे रघुनाथपंत मुधोळकर आणि मोरोपंत जोशी होते. १८९७ मध्ये अमरावतीला कॉग्रेसचे १३ वे अधिवेशन मद्रासचे शंकरन नायर यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. मात्र लोकमान्य टिळक तुरूंगात असल्यामुळे ते या अधिवेशनाला येवू शकले नाही, याची खंत अमरावतीच्या पुढाऱ्यांना वाटत होती. १८९८ मध्ये टिळक तुरूंगातुन बाहेर येताच ११ सप्टेंबरला जाहीर सभा घेऊन अभिनंदनाचा ठराव पारीत केला गेला. १९०४ मध्ये टिळक अमरावतीला आले असता, बडनेरा रेल्वे स्टेशनवर त्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी जमली होती. २८ जुन १९०७ रोजी सार्वजनिक ठिकाणी 'वंदे मातरम' च्या घोषणा दिल्याबद्दल अमरावतीचे जयराम पाटील यांना अटक करण्यात आली. बंगाल फाळणी विरोधात जनमत तयार करण्यासाठी अरविंद घोष १९०८ मध्ये अमरावतीला आले होते, १९१२ च्या बांकीपुरा कॉग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष अमरावतीचे रंगनाथ मुधोळकर होताच, जनतेला आपला गौरव झाल्यासारखे वाटले. ०६ आक्टोबर १९२८ रोजी सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते नगरपालिकेने बांधलेल्या एवीएएम स्कृलच्या भव्य इमारतीचे उद्घाटन झाले. अमरावतीच्या हनुमान व्यायाम शाळेचे आजिव सदस्य राजगूरू यांना भगतसिंग सोबत २३ मार्च १९३१ रोजी ब्रिटीश सरकारने ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या खुनाबद्दल फाशी दिली. इ.स. १९३० मध्ये अमरावती जिल्हयात वीर वामनराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली कायदेभंगाची चळवळ खेडोपाडी सुरू झाली. त्यात जनतेने मोठया प्रमाणात भाग घेतला. वैयक्तीक सत्याग्रह चळवळीतही अमरावती शहर मागे नव्हते. जिल्हयात एकुण ४४ सत्याग्रही केंद्र होते. मुंबईच्या अधिवेशनासाठी अमरावतीमधून पी.के. देशमुख गेले होते.

०८ ऑगस्ट १९४२ रोजी दिवसभर चर्चा झाल्यानंतर 'चलेजाव' चा ठराव मांडण्यापुर्वी जमलेल्या प्रतिनिधींना गांधीजींनी संबोधित केले. यावेळी गांधीजी म्हणाले की, ''या देशातील ब्रिटीश राजवटीचा अंत होणे ही अत्यंत महत्वाची व तातडीची बाब आहे. हा आमचा अंतिम लढा आहे. आता भारत स्वातंत्र्य करू अथवा त्या प्रयत्नात स्वतःचे प्राणार्पण करू, आपली गुलामगीरी चालू असलेली पाहण्यासाठी आम्ही जिवंत राहणार नाही'' असे सांगत इंग्रजांना 'चलेजाव' चा आदेश देवून जनतेला 'करा किंवा मरा' असा संदेश दिला. महात्मा गांधी अशी टोकाची भुमीका घेणार, याची इंग्रजांना कल्पना असल्याने ब्रिटीश सरकार आधिपासुनच सतर्क होते. त्यांनी रात्रीच मुंबईची नाकेबंदी केली. सभा संपताच गांधीजींना दोन तासात अटक केली. तर दिवस उजाडताच कॉग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांनाही अटक करण्यात आली.[१] ०८ ऑगस्ट १९४२ रोजी अधिवेशनात शिक्कामोर्तब झालेला ठराव व गांधीजींचा संदेश घेवून, देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले प्रतिनिधी परत जाण्यास निघताच, ब्रिटीशांनी सर्वत्र धरपकड सुरू केल्याने, सर्व प्रतिनिधी भूमीगत झाले. काहींनी वेश बदलून प्रवासाला सुरवात केली. परंतु अनेकांना पकडण्यात ब्रिटीश सरकारला यश आले. अमरावतीचे पी.के. देशमुख असंख्य अडचणीला तोंड देत आणी पोलीसांच्या नजरा चुकवत जरूडच्या भास्करराव देशमुख यांच्यासोबत अमरावतीला परत येण्यास निघाले खरे. परंतु संपुर्ण प्रवासात केंव्हा व कोठे पकडले जावु याचा नेम नसल्याने, सतत मनावर दडपण घेऊन ते मलकापूर पर्यंत रेल्वेने आले. परंतु मलकापूर रेल्वे स्टेशनवर विदर्भातील अनेक पुढाऱ्यांना अटक झाली. त्यात पी.के. देशमुख यांचे सहकारी भास्करराव देशमुख सुध्दा होते. आता आपणही पकडले जाऊ या भितीने पी.के. देशमुख जागृत झाले, व पुन्हा प्रयुक्तीने ते कसेबसे बचावले. मात्र बडनेरा रेल्वे स्टेशनवर आपण निश्चितच पकडले जाऊ या भितीने ते मुर्तीजापूर येथे उतरले. तेथून त्यांनी काही कार्यकर्त्या मार्फत दर्यापूर, कुष्ट, अचलपूर, पथ्रोट इ. भागात गांधीजीचा संदेश असलेली परिपत्रके व 'करा किंवा मरा' हा संदेश पाठविला. मुर्तीजापुरहून पी.के. देशमुख खासगी मोटारीने अमरावतीला निघाले, पण मार्गातच उतरून त्यांनी शेतकऱ्याचे घोगडे पांघरून पायी कसेबसे ते अमरावतीला पोहोचले. पी.के. देशमुख देवकिसन झंवर यांच्या खोलीवर गेले, तेथून देशमुख यांचे घर जवळच होते.[२]

पी.के. देशमुख यांनी मुंबईहून आणलेल्या कार्यक्रमाच्या प्रती सायक्लोस्टाईल करून, देवकिसन झंवर या भूमीगत कार्यकर्त्याकडे त्याच्या वितरणाचे काम सोपविले.[३] पी.के. देशमुख यांनी देवकिसन झंवर यांच्या घरीच सभेची योजना आखली आणि जाहीर भाषणाचा कार्यक्रम घोषीत करण्यात आला. त्यासाठी वेशांतर करून कशाप्रकारे सभेच्या ठिकाणी जायचे, तेही ठरले. त्यानंतर काळाराम मंदीराच्या मागील बाजूने पी.के. देशमुख यांना घरी पोहचविण्यात आले, सभेची व्यवस्था देवकिसन झंवर यांच्याकडे देण्यात आली होती. मुंबईच्या अधिवेशनात ०८ ऑगस्ट रोजी 'चलेजाव' चा ठराव पास होताच, भारतातील इतर शहराप्रमाणे अमरावती शहरातही ब्रिटीशांनी अटक सत्र सुरू केले. ०९ ऑगस्टला संभाजीराव गोखले, वीर वामनराव जोशी, डॉ. भोजराज यांना तर १० ऑगस्टला डॉ. सोमन, बाळासाहेब मराठे आणि बाळकृष्ण भंडारी यांना अटक करण्यात आली.[४]

पी.के. देशमुख यांना अटक :–

१० ऑगस्टच्या रात्री जोग चौकातील सभेला, मुंबईत पास झालेल्या ठरावाचा मसुदा ऐकण्यासाठी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. संदेशाच्या शेकडो प्रती सभेत वाटण्यासाठी तयार करण्यात आल्या होत्या. पोलीसांच्या गराडयात सभा सुरू झाली,

बालकिसनजी भंडवी यांनी सुरवातीला प्रास्ताविकपर भाषण केले. त्यानंतर सुदरसिंगजी यांनी आपले विचार सभेसामोर मांडले, भाषणाच्या शेवटी मुंबईच्या अधिवेशनाला हजर असलेले एक वक्ते तेथील कार्यक्रमाची माहीती आपणास देतील असे जाहीर केले. तोच एक उंचपुरा तरूण ऊठला. त्या तरूणाने डोक्याला फेटा बांधला होता. अंगात शेरवाणी आणि चुडीदार पैजामा घातला होता. लोकात पी.के. देशमुखांची चर्चा होती. पोलिसांकडे पी.के. देशमुख यांच्या नावाचा वारंट होता. तेही पी.के. देशमुखांचा शोध घेण्यासाठी डोळयात तेल घालून चौफेर नजरा फिरवित होते. ऐवढयात अत्यंत घाईने व थोडक्या शब्दात पी.के. देशमुख यांनी महात्मा गांधीजींचा संदेश जनतेला सांगितला, स्वयंसेवकांनी संदेश पत्रिका वाटल्या. पी.के. देशमुख यांचे भाषण सुरू असतांनाच लोक जोराने ओरडले अरे ! हेच पी.के. देशमुख. या नाटयमय प्रसंगाने प्रभावित होवून लोकांनी 'पी.के. देशमुख की जय' अशा घोषणा दिल्या. तेंव्हा पोलीस जागे होऊन ताबडतोब त्यांनी व्यासपीठ गाठले आणि पी.के. देशमुख यांना अटक केली. पी.के. देशमुख यांना अटक होताच लोक संतापले व घोषणा देऊ लागले. काहींनी तर दगडफेक सुध्दा केली त्यामुळे जमावाला पांगविण्यासाठी पोलीसांनी लाठीमार केला. त्यात कित्येकजण जखमी झाले.[५] पी.के. देशमुख यांच्या अटकेच्या निषेधार्थ लोकांनी अमरावती शहरातील विजेचे दिवे फोडले, विजेचे खांब तोडले. तर रस्त्यावर दगडाचे ढीग पडले होते.[६]

अमरावती शहरात चळवळीला सुरूवात :–

अमरावती शहरात सर्वत्र 'चलेजाव' चळवळीला सुरूवात झाली, शाळा कॉलेजमध्ये विद्यार्थी न गेल्यामुळे ती बंद पडली. अमरावती शहरात विद्यार्थ्यांच्या प्रचंड मिरवणूका निघू लागल्या. पोस्टाच्या काचा फोडण्यात आल्या.[७] १० ऑगस्टला पी.के. देशमुख यांना अटक करून, पोलीसांची सभा उधळल्यानंतर तेलात ठिणगी पडावी त्याप्रमाणे अमरावती शहरात जाळपोळ व तोडफोडीचे प्रकार सर्वत्र सुरू झाले. आपापल्या भागातील सरकारी मालमत्तेचे जेवढे नुकसान करता येईल, तेवढे नुकसान करण्याचा प्रयत्न लोक करीत होते. ११ ऑगस्ट रोजी डॉ. शिवाजीराव पटवर्धन व सुदर्शन संघई यांनी मिरवणूक काढण्याचा प्रयत्न करताच, त्यांना पोलिसांनी अटक केली. परंतु जमाव प्रचंड असल्याने पोलिसांनी लाठीमार केला, त्यात कित्येकजण जखमी झाले. तर किशोर दिघेकर, दौलतराव मोडक, माणिकराव मोरे, भाऊराव मोरे यांना पकडण्यात येऊन खुप मारहाण करण्यात आली. परंतु 'वंदे मातरम्' चा जयघोष त्यांनी बंद केला नाही. १० ऑगस्टला दिवसभर अमरावती शहरात सर्वत्र जाळपोळ व तोडफोडीचे प्रकार सुरूच होते. या दिवशी ८० लोकांना अटक करण्यात आली त्यात रघुनाथमल कोचर यांचाही समावेश होता.[८] ब्रिटीश सरकारने वृत्तपत्रावर बरीच बंधने लादल्याने, खऱ्या व विस्तृत बातम्या मिळत नव्हत्या ज्या बातम्या मिळत त्या ब्रिटीशांच्या अन्याय, अत्याचार आणि दडपशाहीच्या असत. त्यामुळे नागरीकात संतापाची लाट उसळली. अमरावती शहरातील लोकप्रिय पुढाऱ्यांना अटक झाल्याने तरूण संतप्त मनःस्थितीत होते. त्याचा परिणाम म्हणजे पोलिस व तरूणवर्ग यांच्यात अधूनमधून झटापटी होतच होत्या. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 'पत्थर सारे बॉम्ब बनेंगे' या भविष्यकथनाची सर्वत्र प्रचिती येत होती. दगडांनी शहरात बॉम्बची जागा घेतली होती. अमरावती शहरात ठिकठिकाणी लोक 'महात्मा गांधीकी जय' , 'चलेजाव', 'भारत माता की जय' अशा घोषणा देत होते.[९]

कृष्णाबाई रंगारी : अमरावती शहरातील पहिली शहीद :–

अमरावती शहरात ११ ऑगस्ट रोजी नगरपालिकेसामोर जमलेल्या प्रचंड जनसमुदायाने रस्ता अडविला होता. लोक जवळच असलेल्या सिटी कोतवालीवर राष्ट्रीय ध्वज लावण्याचा विचार करीत होते. अशा तणावपूर्ण परिस्थितीत जमावाला पांगविण्यासाठी बंदुकधारी पोलिसशिपायासह पोलीसांच्या मोटारी शहर कोतवालीतून बाहेर पडल्या, व नळघराजवळ पोलिसांनी उतरून, हटजाव, हटजाव म्हणत पोलीस लोकांना पांगविण्याचा प्रयत्न करीत होते. तर नगरपालीकेसामोर व नगरवाचनालयाच्या बाजूला असलेले लोक घोषणा देत, पोलिसांवर दगडफेक करू लागले. त्यामुळे मेल्ड्रमने चिडून पोलिसांना लाठीमार करण्याचा आदेश दिला. लाठीमारानेही लोक पांगत नाही असे दिसताच, पोलिसांनी गोळीबाराला सुरूवात केली. प्रथम पोलिसांनी हवेत गोळीबार केला, तर पोकांनी प्रतिकारार्थ दगडांचा मारा तिव्र केला, चारही बाजूंनी लोक पोलिसांवर दगडांचा वर्षाव करीत असल्याने पोलिसांनीही अक्षरशः गोळयांचा वर्षाव सुरू केला. निशस्त्र जनता व शस्त्रधारी पोलीस यांच्यात जणू एक प्रकारे संघर्षच सुरू झाला होता. पोलीस जमावाच्या दिशेने सतत गोळीबार करीत होते.[१०] याचवेळी मोर्शी तालुक्यातील एक तरूण महिला राजकमल चौकातून जात होती. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या बांधवाचा संघर्ष ती मोठया अभिमानाने पाहत होती. अभिवतपणे ती त्या समुदायात सहभागी झाली. ऐवढयात पोलिसांची एक गोळी त्या तरूण स्त्री कृष्णाबाई रंगारीच्या छातीत घुसली. रक्ताच्या थारोळयात कृष्णाबाई जमिनीवर पडली, कृष्णाबाई खाली पडताच पोलिसांनी तिला घेराव घातला आणि लोकांना तिच्यापासून लांब पिटाळत नेले. लोकांची पांगापांग झाली होती. तिथे फक्त पोलीस आणि मातृभूमीच्या कुशीत कायमची विसावलेली कृष्णाबाई रंगारी एक विरांगना देशाच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झाली. कृष्णाबाई शहीद झाली हे लोकांना कळले तर लोक अधिकच प्रक्षुब्ध होतील, या भितीने पोलिसांच्या पहाऱ्यात कृष्णाबाईला गाडीत टाकले आणि कुणालाही कळू न देता पोलिसांनीच कृष्णाबाईवर अंत्यसंस्कार केला.[११]

अमरावती शहरात भूमिगत कार्यकर्त्यांचे वास्तव्य :

नागपूरच्या हिंदुस्थानी लालसेनेचे फौजी कौन्सिलचे सर सेनापती श्यामनारायण काश्मिरी नागपूर, शहरातील धरपकडीमुळे भूमिगत झाले होते, भूमिगत असतांना ते अमरावतीला आले आणि अमरावती शहरातील काळाराम मंदीराच्या मागे राहत असलेले जेठमलजी वंजीर यांच्याकडे ८–१० दिवस राहीले होते. श्यामनारायण काश्मिरी नंतर थोडयाच दिवसात मगनलाल बागडीही अमरावतीला आले. मगनलाल बागडी यांना ब्रिटीश अधिकारी पकडण्याचा प्रयत्न करीत आल्यामूळे ते भूमिगत झाले होते. मनगलाल बागडी बरेच दिवस अमरावतीत होते. काही दिवस मिर्झाकडे तर काही दिवस रामचंद्र ठाकूर यांच्याकडे मगनलालजीचे वास्तव्य होते. मगनलालजी यांनी अमरावतीत सुध्दा आपले कार्यक्षेत्र निर्माण केले होते. अमरावतीला असतांना त्यांचा अनेक कार्यकर्त्यांशी संबंध आला, त्याचप्रमाणे नुकताच तुरूंगातून सुटून आलेला कार्यकर्ता व बालवीर मंडळाचा सदस्य किशोर नारायण हा तर मगनलालजीचा फारच जवळचा विश्वासू कार्यकर्ता बनला होता. शहरातील सर्व बातम्या मगनलाल बागडी

यांना किशोर नारायण मार्फतच कळत होत्या. मगनलाल बागडी यांच्या सल्यानुसारच किशोर नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली बुलेटीन्स काढणे, त्याचा प्रसार करणे, पोलिसांच्या गाडया पंचर करणे व तरूणांना संघर्षाकरीता तयार करणे इ. कार्य शहरात चालु होते. त्यामुळे बबन यादव काशीराव बादल प्यारेलाल पहेलवाण इ. अनेक कार्यकर्ते शहरात सरकारी कामकाजात या ना त्या मार्गाने अडथळा निर्माण करीत होते.[१२]

अमरावती शहरात बॉम्ब तयार करण्याचा प्रयत्न :

मेल्ड्रमचा बंगला उडविण्यासाठी अमरावतीत बॉम्ब बनविण्याचे ठरविले अथक प्रयत्न करून बॉम्ब तयार करण्यात आला. बॉम्ब बरोबर बनला की नाही, हे बघण्यासाठी रेल्वेच्या पुलावर त्याची चाचणी घेण्यात आली. परंतु प्रचंड आवाजाखेरीज हा बॉम्ब पुलाचा एक लहानसा तुकडा देखील पाडू शकला नाही. तंत्रज्ञानाच्या अभावी अपयश तर आलेच, परंतू पोलिसांचा ससेमिरा मात्र पाठीमागे लागला. आणि मगनलाल बागडी अमरावती शहरात कोठेतरी आहे, असे वृत्त पोलीसांना कळताच पोलीस अधिक सावध झाले म्हणुन मगनलाल बागडी व किशोर नारायण यांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला.[१३] मगनलाल बागडी नाशिकमार्गे मुंबईला जावून पोहचले.[१४]

निष्कर्ष :–

अमरावती शहरातील लोकांनी स्वातंत्र्यलढयाच्या सर्वच चळवळीत उत्स्फुर्तपणे भाग घेतला होता. १९४२ च्या मुंबई अधिवेशनाला अमरावतीतून पी.के. देशमुख यांनी उपस्थित राहून कार्यक्रम पत्रिका, अनेक संकटाचा सामना करत अमरावती येथे आणली होती. त्याच्या अनेक प्रती काढुन, त्या शहरासह इतर ग्रामीण भागात पाठविण्यात आल्या होत्या. मुंबईचा कार्यक्रम अमरावतीच्या प्रचंड सभेत वाचून दाखविताच, इंग्रजांनी पी.के. देशमुख यांना अटक केली. या सभेनंतर अमरावती शहरात सर्वत्र १९४२ च्या स्वातंत्र्यलढयाला सुरूवात होऊन ठिकठिकाणी मोर्चे, मिरवणुका निधु लागल्या ब्रिटीशांसामोर अडचणी निर्माण करणे त्यांचा उद्देश होता. अमरावती शहरात जमावाला पांगविण्यासाठी केलेल्या गोळीबारात कृष्णाबाई रंगारी ही तरूणी शहीद झाली, शहीद झाल्याची बातमी अमरावती शहरात कळू नये, म्हणून पोलिसांनी कृष्णाबाईला पोलिसांच्या गराडयात उचलुन नेले व चुपचाप तिचा अंत्यसंस्कार पण केला. विदर्भातील १९४२ च्या लढयात शहीद होणारी कृष्णाबाई रंगारी एकमेव महिला होती.

संदर्भ :

१)दिघेकर नानासाहेब : सुवर्ण महोत्सवी स्वातंत्र्यदिन स्मरणिका पृ.क्र ३६
२)दिघेकर नानासाहेब : अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा पृ.क्र ५६,५७
३)मराठे बाळासाहेब : दैनिक हिंदुस्तान १५ ऑ. १९७२ पेज नं ०९
४)दिघेकर नानासाहेब : अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा पृ.क्र ५७
५)कित्ता : पृ.क्र ५७,५८
६)मराठे बाळासाहेब : दैनिक हिंदुस्तान १५ ऑ. १९७२ पेज नं. ०९
७)देशपांडे हरीहरवा : यावलीचा स्वातंत्र्य संग्राम पृ.क्र ७१
८)दिघेकर नानासाहेब : अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा पृ.क्र ५८
९)कित्ता : पृ.क्र ५८,५९
१०)कित्ता : पृ.क्र ५९,६०
११)धर्माधिकारी तारा : स्वातंत्र्य लढयातील स्त्री पृ.क्र ९२
१२)दिघेकर नानासाहेब : अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा पृ.क्र ६०
१३)कित्ता : पृ.क्र ६०
१४)पवार महादेव : हिंदुस्थानी लालसेना का इतिहास पृ.क्र १७०